गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ३५२ वा | सोमवार १३ मे २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 352 | Date : 13/05/2024 blow Monday Page 4 Price 4

## चौथ्या टप्प्यात महायुतीची कसोटी; राज्यातील ११ जागांसाठी आज मतदान

मुंबई / नवी दिल्ली दैनिक यशसिध्दि न्यूज :

चौथ्या टप्प्यात राज्यातील ११ मतदारसंघांमध्ये आज, सोमवारी मतदान होणार आहे. ११ पैकी नऊ मतदारसंघ सध्या महायुतीकडे असून ते कायम राखण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे असेल. त्यात अंतरिम जामिनावर बाहेर आलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी भाजपची कोंडी करण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'पंचाहत्तरी'चा मुद्दा शनिवारी उपस्थित केल्यानंतर रविवारी 'केजरीवाल की गॅरंटी' देत त्यांनी भाजपला आव्हान दिले आहे. या मुद्द्यांचा राज्यातील पुढील दोन टप्प्यांत प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

नंदुरबार, जळगाव, रावेर, नगर, शिर्डी, बीड, औरंगाबाद, जालना, पुणे, शिरूर आणि मावळ या ११ मतदारसंघांत सोमवारी मतदान होणार आहे. यापैकी शरद पवार गटाकडील शिरूर आणि एमआयएमकडील औरंगाबादची जागा वगळता सर्व विद्यमान खासदार महायुतीत असून



या जागा कायम राखण्याचे आव्हान असेल. पहिल्या तीन टप्प्यांत राज्यात सरासरी ६२ टक्के मतदान झाले असून आपल्या अधिकाधिक मतदारांना बाहेर काढण्याचे आव्हान राजकीय पक्षांसमोर असेल.

एकीकडे राज्यात महायुती आणि मविआमधील चुरस, वाद वाढीला लागला असताना केजरीवाल यांनी नवा मुद्दा उपस्थित करून सत्ताधाऱ्यांची पुरती कोंडी केली आहे. 'पुढील वर्षी मोदी ७५ वर्षांचे होत असून त्यांच्या जागी अमित शहा पंतप्रधान बनतील,' असा दावा त्यांनी शनिवारी केला. भाजप प्रामुख्याने मोदींचा चेहरा समोर ठेवून मते मागत असताना या विधानामुळे राज्यातील उर्वरित २३ मतदारसंघांसह दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश या उत्तरेतील राज्यांच्या मतदारांमध्ये गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे. यावर स्पष्टीकरण देताना भाजप नेत्यांनी पुरती दमछाक होत असल्याचे दिसते. केजरीवालांच्या दाव्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना हैदराबादमध्ये तातडीने खंडन करावे लागले. 'पंचाहत्तरी पार केल्यानंतरही मोदीच पंतप्रधानपदी कायम राहतील', असे त्यांनी जाहीर केले. तर 'निदान मोदी पंतप्रधान होणार हे तरी केजरीवालांनी मान्य केले', अशी मोजकी प्रतिक्रिया राज्यसभा खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी दिली. दुसरीकडे 'केजरीवाल की गॅरंटी' देत चीनने बळकावलेली जमीन परत मिळविणे, दिल्लीला संपूर्ण राज्याचा दर्जा आदी १० आश्वासने 'आप'ने दिली आहेत.

२०१४ मध्ये मोदी पंतप्रधान झाल्यानंतर, भाजपने ७५ वर्षे पूर्ण झालेल्या नेत्यांना राजकारणातून निवृत्त करण्याचा नियम केला. याआधारे लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते 'मार्गदर्शक मंडळा'त गेले. पुढील वर्षी सप्टेंबरमध्ये मोदींना ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने या नियमानुस मोदींनी निवृत्ती घेऊन भाजपच्या मार्गदर्शक मंडळात गेले पाहिजे, असे केजरीवालांनी अप्रत्यक्षपणे सुचविले आहे. तसे झाले तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा नवे पंतप्रधान होतील. त्यापेक्षा मतदारांनी भाजपला मते देऊ नये, असे आवाहन केजरीवाल यांनी केले आहे.

## सोलापुरात कांद्याच्या ९३ पिशव्यांना केवळ १० हजार रूपये पट्टी, आवक कमी होऊनही दर घसरण

सोलापूर/प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकांच्या तिसर्या टप्प्याचे मतदान होऊन आठवडाही उलटत नाही, तोच सोलापुरात कांदा दराची घसरण सुरू झाली असून त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. माढा तालुक्यातील एका



कांदा उत्पादक शेतकऱ्याना आणलेल्या कांद्याच्या ९३ पिशव्यांना केवळ १० हजार रूपयांचा भाव मिळाला. या शेतकऱ्याने कांद्याच्या लागवडीसाठी केलेला खर्च ६० हजार रूपयांपर्यंत झाला होता. प्रत्यक्षात त्याच्या हातात कांद्याची पट्टी १० हजार रूपये आली.

सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या कांद्याची आवक घटून १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत होत असूनही कांद्याच्या दरात वाढ होण्याऐवजी घट होत आहे. लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान ७ मे रोजी झाले. त्याआगोदर सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये दररोज २५ हजार क्विंटलपर्यंत कांद्याची आवक होत होती. त्यावर प्रतिक्विंटल दर १४०० रूपये ते २७०० रूपयांपर्यंत मिळत होता. परंतु लोकसभेचे मतदान होऊन आठवडाही होत नाही तोच कांद्याची आवक कमी होऊन सुध्दा कांदा दर वाढण्याऐवजी उलट घटत चालला असल्याचे दिसून येते.

दोन दिवसांपूर्वी सुमारे २५ हजार क्विंटल कांदा दाखल झाला असता दर घसरण होऊन कमाल दर २२०० रूपये आणि सरासरी दर ११०० रूपये मिळत होता. त्यानंतर कांदा आवक १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत खाली आली असता दर मात्र एक हजार ते दोन हजार रूपयांपर्यंत मिळाला आहे. सरासरी दरापेक्षा कमी म्हणजे पाचशे रूपयांपर्यंत दर मिळालेल्या कांद्याचे प्रमाण जास्त आहे.माढा तालुक्यातील दारफळ सीना येथील कांदा उत्पादक शेतकरी पृथ्वीराज चव्हाण यांनी सुमारे ६० हजार रूपये लागवड खर्च करून पिकविलेला ९३ पिशव्या कांदा विक्रीसाठी सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये आणला असता सूर्या लकी ट्रेडर्समध्ये कांद्याला कवडीमोल दर मिळाला. त्याच्या हातात केवळ १० हजार रूपयांची पट्टी आली. लागवड खर्चाच्या २० टक्के खर्च निघाला नाही. त्याबद्दल पृथ्वीराज चव्हाण यांनी खंत व्यक्त नशिबाला दोष दिला आहे. असे अनेक शेतकरी कांदा दर घसरणीमुळे निराश झाले आहेत.

## दिल्लीतील दोन रुग्णालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी

नवी दिल्ली : अलीकडेच दिल्लीतील शाळांना बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली होती. यानंतर रविवारी दिल्लीतील दोन रुग्णालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली आहे. यावेळीही धमकी देणाऱ्या व्यक्तीने जुन्या पद्धतीने ई-मेल पाठवत ही धमकी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा धमकीचा मेल दिल्लीतील संजय गांधी रुग्णालय आणि बुरारी रुग्णालयाला आला आहे. मात्र आतापर्यंत रुग्णालय परिसरातून काहीही संशयास्पद आढळूनआलेले नाही.

## जेजुरीत पॅरामोटर घरावर कोसळले, अपघातात एक महिला जखमी

जेजुरी : जेजुरी येथील कडेपठार रस्त्यावर असलेल्या फ्लाईंग रायनो पॅरामोटरिंग एडवेंचर स्पोर्ट सेंटरचे एक पॅरामोटर अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने चिंचेच्या बागेजवळील एका पत्र्याच्या घरावर कोसळले. या अपघातात पॅरामोटरिंग करणारी युवती अस्था प्रदिप माने ( वय , १७ रा.वाकड,पुणे ) व पायलट चंद्रकांत महाडिक हे जखमी झाले आहेत. आज सायंकाळी पाच वाजता पॅरामोटरने अस्था माने यांना घेऊन उड्डाण केले.काही वेळातच पॅरामोटर छत्रीच्या मंदिराजवळ आल्यावर वाकडे-तिकडे हेलकावे खाऊ लागले व ते खाली आले. भरवस्तीमध्ये असलेल्या देरकर वाड्यातील सतिश गोडसे यांच्या पत्र्याच्या घरावर ते कोसळले.रविवार असल्यामुळे या परिसरामध्ये भाविकांची प्रचंड गर्दी होती. हे पॅरामोटर घरावर कोसळल्याने सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.या घरामध्ये एक महिला स्वयंपाक करीत

## राज ठाकरेंचं पुन्हा 'लाव रे तो व्हिडीओ', सुषमा अंधारेंची क्लिप दाखवत उद्धव ठाकरेंवर टीका

पुणे/ दैनिक यशसिध्दि न्यूज :

मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा देण्याची घोषणा केल्यानंतर महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यास सुरवात केली आहे. आज त्यांनी ठाण्यातील शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. या सभेत त्यांनी पुन्हा एकदा २०१९ प्रमाणे 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत व्हिडीओ लावला. मात्र यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा नाही तर सुषमा अंधारे यांच्या भाषणाची क्लिप दाखविण्यात आली. या क्लिपवरून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. उद्धव ठाकरे हे वारंवार माझे वडील चोरले असे म्हणत आहेत, या विधानाचाही समाचार राज ठाकरे यांनी घेतला. राज ठाकरे



म्हणाले, वडील चोरले हा निवडणुकीचा विषय असू शकतो का? फोडाफोडीचे राजकारण मला मान्य नाही. पण जे लोक आज आमचा पक्ष फोडला म्हणून बोलत आहेत, त्यांनी त्यांच्या इंडिया आघाडीतील नेत्यांकडे एकदा पाहावे. त्यांनी याआधीच काय उद्योग केलेत? हे आठवा. याच उद्धव ठाकरेंनी मनसेचे सात पैकी सहा नगरसेवक खोके देऊन तोडले होते. तेव्हा तुम्हाला काही नाही वाटलं.

महाराष्ट्रात फोडाफोडीच्या राजकारणाची कुणी सुरुवात केली असेल तर ती शरद पवारांनी केली. पुलोदची स्थापना करून त्यांनी काँग्रेसला फोडले. त्यानंतर १९९१ साली शरद पवारांनी छगन भुजबळांना बाहेर काढून बाळासाहेबांची शिवसेना फोडली. तेव्हा शिवसेनेचे आमदार फोडण्याचे काम शरद पवारांनी केले. आज छगन भुजबळ याबाजूला आहेत. मी बाहेरून पाठिंबा दिला असल्यामुळे मी काहीही बोलू शकतो, असेही राज ठाकरे म्हणाले. त्यानंतर नारायण राणे यांना घेऊन काँग्रेसने शिवसेना फोडली गेली, अशी आठवण राज ठाकरे यांनी सांगितली.यानंतर राज ठाकरे यांनी लाव रे तो व्हिडीओ असं म्हणत सुषमा अंधारे यांचा । पान २ वर

## मी यापुढे निवडणूक लढवणार नाही, एकनाथ खडसेंची मोठी घोषणा



मुंबई/ दैनिक यशसिध्दि न्यूज :

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि विधान परिषदेचे आमदार एकनाथ खडसे आता भाजपात जाणार आहेत. महिन्याभरापूर्वीच त्यांनी याबाबत माहिती दिली होती. परंतु, लोकसभा निवडणुकीच्या कार्यक्रमामुळे त्यांचा भाजपा प्रवेश रखडला आहे. तसंच, ते यापुढे निवडणूक लढवणार नसल्याचंही त्यांनी आज स्पष्ट केलं. ते एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.

उत्तर महाराष्ट्रातील मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघातून २०१९ मध्ये विधानसभेची निवडणूक हरलेल्या रोहिणी खडसे २०२० मध्ये एकनाथ खडसे यांच्याबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आल्या. एकनाथ खडसे यांनी ४० वर्षांचे भाजपाबरोबरचे ऋणानुबंध तोडून शरद पवारांना साथ दिली. शरद पवारांच्या साथीने एकनाथ खडसे पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय झाले होते. परंतु, राष्ट्रवादीत भवितव्य दिसत नसल्याचं कारण देत त्यांनी पुन्हा भाजपात जाण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या काही काळात त्यांचा भाजपात जाहीर प्रवेश होईल. परंतु, त्यांच्याबरोबर राष्ट्रवादीत गेलेल्या त्यांच्या कन्या रोहिणी खडसे मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच राहणार आहेत.याबाबत । पान २ वर

## निवडणूक कर्तव्यावर मतदान पथके रवाना

छत्रपती संभाजीनगर/ दैनिक यशसिध्दि न्यूज :

लोकसभा निवडणूक २०२४ अंतर्गत १९- औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात तसेच १८-जालना लोकसभा मतदारसंघात समाविष्ट विधानसभा क्षेत्रनिहाय नियुक्त मतदान



पथके आज रवाना झाली.१९-औरंगाबाद लोकसभा मतदार संघात २०४० तर १८ जालना मतदार संघात १०४५ मतदान केंद्रांवर ही पथके पोहोचतील. सोमवार दि.१३ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वा. पर्यंत मतदानाची वेळ आहे. जिल्हा प्रशासन मतदानासाठी सज्ज असून मतदारांनी आपला हक्क बजवावा असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी मतदारांना केले आहे.

आज सकाळी ८ वाजल्यापासून विधानसभा क्षेत्रनिहाय मतदान पथकांना मतदान साहित्य वाटपास सुरुवात झाली. प्रत्येक ठिकाणी सहा. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात हे वितरण करण्यात आले. पावसाची शक्यता लक्षात घेता प्लास्टीक बॅग सुद्धा साहित्य आच्छादनासाठी देण्यात येत होती.

१०७ औरंगाबाद (मध्य) विधानसभा क्षेत्राचे साहित्य वाटप शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय परिसरात, १०८ औरंगाबाद (पश्चिम)चे साहित्य वाटप शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि १०९ औरंगाबाद (पूर्व) मतदारसंघातील साहित्य वाटप सेंट फ्रान्सिस हायस्कूल जालना रोड येथे करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रत्येक विधानसभा क्षेत्रनिहाय साहित्य वितरण संबंधित सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या देखरेखीत करण्यात आले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सकाळी या ठिकाणी भेट दिली. औरंगाबाद (पश्चिम),। पान २ वर

## महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांत पावसाचा अंदाज

नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज :

महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमध्ये पुढील तीन दिवसांत विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. देशात एकीकडे उन्हाचा तडाखा वाढत असताना हवामान विभागाने हा इशारा दिला आहे. तसेच हवामान खात्याच्या माहितीनुसार चांगल्या मान्सूनची चिन्हे दिसू लागली आहेत. तसे बदल प्रशांत महासागर आणि हिंदी महासागरात दिसू लागले आहेत. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार १३ मे रोजी महाराष्ट्रासह उत्तराखंड, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक, हिमाचल प्रदेशात विजांचा कडकडाट होऊ शकतो. तर हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेशात धुळीचे वादळ येण्याची शक्यता आहे. यावेळी ताशी ४० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. तसेच केरळ, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १४ मे ला छत्तीसगड, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा आणि कर्नाटकमध्ये वादळ येण्याची शक्यता आहे. त्याठिकाणी वारे ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वाहू शकतात. याच दिवशी महाराष्ट्र, छत्तीसगड, गुजरात, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये विजांचा कडकडाटी असण्याची शक्यता आहे. उष्णतेचा परिणाम गुजरातमध्ये दिसून येणार आहे. तर १५ मेला ईशान्येकडील राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटाचा इशारा देण्यात आला आहे.

# संपादकीय

## हवा दिली गेली नाही...

राजकीय वातावरण तापलेले आहे. या महिन्याच्या अखेरीपर्यंत ते असेच तापलेले राहील. आरोपप्रत्यारोपांच्या फैरी झडतील, दावे-प्रतिदावे केले जातील. प्रत्येक पक्षाने जाहीरनामे प्रसिध्द केल्यामुळे सत्तेत आल्यावर काय करणार आहोत हे सर्वसामान्य जनतेला सांगण्याची कोणतीही आवश्यकता कोणत्याच पक्षाला वाटत नाही. सुज्ञ नागरिकांना ठाऊक आहे की हे जाहीरनामे निरर्थक आहेत. प्रत्येक जण आपले उखळ पांढरे करण्याची संधी साधण्याच्या प्रयत्नात आहे. म्हणूनच या जाहीरनाम्याच्या तसेच वचननाम्याच्या अनुषंगाने ठोस असे कोणीच बोलत नाही. सर्वजण चिखलफेकीत रंगले आहेत. आरोप-प्रत्यारोप करतानाही अलीकडच्या घटनांपेक्षा इतिहासातील घटनांवरच जास्त भर दिला जात आहे. पाच वर्षांपूर्वीच्या विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या शपथविधीपासून थेट दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या राजवटीपर्यंतच्या अनेक गोष्टी उकरून काढल्या जात आहेत. रोजगार, तरुणांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, आरोग्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था हे मूलभूत मुद्दे मागे पडले आहेत. हेच खरे लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न आहेत. मतदानाचा टक्का कमी होत असण्यामागे हेदेखील एक कारण आहे. आता तर मुंबईवर झालेल्या २६/११ च्या अतिरेकी हल्ल्याबाबत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यावरून वादंग सुरू आहे. या घटनेला जवळपास १६ वर्षे झाली आहेत. या हल्ल्यात एटीएस प्रमुख हेमंत करकरे, विजय साळस्कर, अशोक कामटे या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह १४ पोलीस शहीद झाले. मात्र, त्यापैकी हेमंत करकरे यांचा कसाबच्या गोळीबारात मृत्यू झाला नाही, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या गोळीने त्यांचा मृत्यू झाला. ज्येष्ठ वकील आणि सध्या उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार उज्ज्वल निकम यांनी ही गोष्ट दडवल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला आहे. अर्थातच त्यांच्या या दाव्याला ना त्यांच्या पक्षाकडून समर्थन मिळाले, ना महाविकास आघाडीकडून. असे विधान करून काँग्रेसच्या पदरी काय पडले. वास्तविक करकरे यांच्या मृत्यूबाबत माजी मुख्यमंत्री दिवंगत ए. आर. अंतुले यांनी ही घटना घडली त्याच वर्षी २००८ मध्ये हाच प्रश्न उपस्थित केला होता, पण त्याला जास्त हवा दिली गेली नाही.

पान १ वरुन

## राज ठाकरेंचं पुन्हा 'लाव रे ता..

जुना व्हिडीओ दाखविला. त्या व्हिडीओमध्ये सुषमा अंधारे यांनी बाळासाहेब ठाकरेंचा उल्लेख 'म्हातारा' असा केला होता. या व्हिडीओच्या अनुषंगाने राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. जर तुमचे वडिलांवर प्रेम असते तर बाळासाहेबांबद्दल आक्षेपार्ह बोलणाऱ्या सुषमा अंधारेंना पक्षात घेऊन प्रवक्ते पद का दिले? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला. ज्या छगन भुजबळांनी बाळासाहेबांना अटक करण्याचा प्रयत्न केला होता, त्या भुजबळांबरोबर तुम्ही २०१९ साली मंत्रीपदाची शपथ घेतली. तेव्हा वडिलांना अटक करायला लावणाऱ्या व्यक्तीबरोबर मंत्रिमंडळात कसे बसलात?

## मी यापुढे निवडणूक लढवणार..

एकनाथ खडसे म्हणाले, मी ज्यावेळी भाजपात जायचं ठरवलं तेव्हा मी रोहिणीताईंनाही सांगितलं की माझ्याबरोबर भाजपात चला. परंतु, रोहिणीताईंनी सांगितलं की मी शरद पवारांबरोबरच राहू इच्छिते. गेले काही वर्षे मी येथे काम करते आहे. मला इथे मान सन्मान दिला आहे. आणि मला त्यांचे तत्व आवडतात. त्यामुळे मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राहीन. मला पुढच्याही निवडणुका लढवायच्या आहेत. आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये भवितव्य आहे, असं तिला वाटतंय. म्हणून तिने भाजपात माझ्याबरोबर येण्यास नकार दिला.

आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपाकडून मुक्ताईनगरसाठी एकनाथ खडसेंना संधी मिळण्याची शक्यता आहे. तर, शरद पवारही रोहिणी खडसेंना संधी देतील, अशी चर्चा आहे. त्यामुळे बाप-लेकीत हा सामना रंगू शकतो. याबाबत एकनाथ खडसे म्हणाले, रोहिणीताई राष्ट्रवादीत आहेत. त्यामुळे त्या प्रामाणिकपणे राष्ट्रवादीच्या प्रचाराचं काम करत आहेत. त्यामुळे नंतरच्या कालखंडात मी भाजपात प्रवेश केला तर भाजपाचंच काम करणार. यापुढे निवडणूक लढवण्याची माझी इच्छा नाही. मी सध्या विधान परिषदेचा आमदार आहे. शरद पवारांनी मला सांगितलंय की मी दिलेली वस्तू परत घेत नाही. शरद पवारांनीच मला अभय दिलं असल्याने मला दुसरा कोणी राजीनामा मागितला तरी फरक पडत नाही.

पण राजकीय निवृत्ती घेतलेली नाही

मी राजकारणातून निवृत्ती घेतलेली नाही. मी राजकीय माणूस आहे. पण आता निवडणूक लढवण्याकडे माझा कल नाही, असंही त्यांनी पुढे स्पष्ट केलं.

# सावधान ! तुमच्या दाढीचा रेझर देऊ शकतो हे भयानक आजार





क्लीन शेव करण्यासाठी किंवा शरीरावरील केस काढण्यासाठी बहुतांशवेळा रेझरचाच उपयोग केला जातो. शरीरातील इतर भागांतील केस काढण्यासाठी हेअर रिमूवल क्रीम किंवा इतर केमिकल प्रोडक्टपेक्षा रेझरचा उपयोग सुरक्षित असतो. पण चुकीच्या पद्धतीने याचा वापर केला तर तुम्हाला अनेक प्रकारचे आजार जडवू शकतो. यामध्ये काही त्वचेसंबंधी असतील तर काही गंभीरही असू शकतील.**त्वचा इन्फेक्शन** रेजरचा उपयोग ब्लेड बदलून एकापेक्षा अधिकवेळा केला जातो. रेझर ओलं राहिल्यास किंवा ते व्यवस्थित साफ न झाल्यास त्यामध्ये सूक्ष्म किटाणू जमा होतात. पुढच्या वेळेस वापरताना धुवल्यानंतरही ते जात नाहीत. यामुळे फंगल किंवा यीस्ट इंफेक्शन होण्याची शक्यता असते. यातून वाचण्यासाठी रेझरचा वापर करुन झाल्यावर प्रत्येकवेळेस स्वच्छ धुवून सुकवायला हवं. असं न केल्यास तुम्ही वेगवेगळ्या बॅक्टेरियल आणि वायरल इन्फेक्शनच्या विळख्यात येऊ शकता.

**फॉलिक्युलाइटिस** दुसऱ्याने वापरलेलं रेजर वापरल्यास फॉलिक्युलाइटिस आजाराचा धोका असतो. फॉलिक्युलाइटिस झाल्यास तुमच्या शरीरावर रॅशेस दिसून त्यातून मऊ पदार्थ बाहेर येतो. रेशेस पूर्णपणे निघून जाईपर्यंत शेव्हींग करु नये. याकडे दुर्लक्ष केल्यास चेहऱ्यावर डाग दिसू लागतात.

**एमएसआरए** एमएसआरए हे एक गंभीर स्किन इंफेक्शन असून यामुळे जीवही जाऊ शकतो. एक किंवा एकापेक्षा जास्त लोकांसोबत रेझर शेअर केल्याने हा आजार जडू शकतो. यामध्ये त्वचेला सूज येते आणि त्वचा लाल होते.

एमएसआरएमुळे तुम्हाला तापही येऊ शकतो.**फोड आणि डाग** रेझर शेअर करण्याने आणि वापरानंतर न धुतल्यास किंवा किटाणुनाशकचा वापर न केल्यास त्यात बॅक्टेरियल इन्फेक्शनचा धोका वाढतो. यामधलं स्टाफीलोकोकस इंफेक्शन सामान्य असतं. स्किन इन्फेक्शन हे रेझरच्या चुकीच्या वापरामूळे होतं. यामुळे चेहऱ्यावर फोड आणि डाग दिसू लागतात.**हेपेटाइटिस** रेझर वापरल्यानंतर किंवा वापरानंतर गरम पाण्याने धुणे गरजेचे आहे. रेझर, शेव्हींग ब्रश कोणासोबत शेअर करु नका. कोणत्याही बॅक्टेरियल इन्फेक्शन झालेल्या व्यक्तिसोबत हे शेअर केल्यास तुम्हालाही ते होण्याची शक्यता जास्त असते.

हेपेटाइटिसच्या रुग्णांसोबत रेझर किंवा ब्लेड शेअर केल्यास तुम्हालाही हा त्रास उद्भवू शकतो.

# वास्तुशास्त्रानुसार घराच्या आसपास ही झाडे असणे अशुभ



घर बांधताना ते वास्तुशास्त्रानुसार बांधले जावे, तसेच घराची सजावट करीत असताना वास्तूसाठी शुभ असणाऱ्या वस्तूंचा घरामध्ये आवर्जून समावेश करण्याबाबत आपण जागरूक असतो. घरामधील वातावरण प्रसन्न असावे, घरामध्ये सकारात्मक ऊर्जेचा संचार असावा, घरामध्ये कोणत्याही प्रकारचे अस्वास्थ्य, ताणतणाव, आरोग्याशी संबंधित तक्रारी असू नयेत, आर्थिक सुबत्ता नांदावी ह्यासाठी वास्तुशास्त्रानुसार घराची रचना करून घेणे अगत्याचे आहे. ह्या नुसार केलेली घराची रचना कोणत्याही प्रकारची रूढी किंवा परंपरेचे पालन करायचे म्हणून केलेली नसून, त्यामागे शास्त्रीय कारणे आहेत. म्हणूनच घराचे बांधकाम किंवा घरातील सजावट ही वास्तुशास्त्रानुसार हवी, ह्याबद्दल आपण आग्रही असतो.

पण हे सर्व करीत असताना आणखी एक महत्वाची गोष्ट आपण विचारात घ्यायला हवी, ती ही, की वास्तूचे शुभ-अशुभ परिणाम, केवळ घराची संरचना कशी आहे, किंवा घरामध्ये कुठल्या वस्तूंची मांडणी कशी आणि कुठे केली आहे ह्यावरच अवलंबून नसून, घराच्या आसपास, अवती-भोवती कुठल्या वस्तू आहेत ह्यावरही अवलंबून असतात. आपल्या घराला सुंदर बनविण्याच्या दृष्टीने आपण घरामध्ये किंवा बाहेर बागेमध्ये अनेक झाडे लावत असतो. ह्यांचे देखील शुभाशुभ परिणाम होत असतात. मनी प्लांट सारखे झाड घरामध्ये वास्तुशास्त्राने निर्देशित दिशेकडे लावले, तर ते शुभ परिणाम देणारे आहे. तसेच तुळस, पारिजातक, उंबर ही झाडे घराच्या आसपास असणे शुभ मानले गेले आहे.पण काही झाडे अशी आहेत, जी घराच्या आसपास असणे अशुभ मानले जाते. विशेषतः घराच्या ईशान्येला आणि पूर्वेला उंच झाडे असणे अशुभ मानले गेले आहे. तसेच घराच्या परिसरामध्ये अर्धवट वठलेली, वाळलेली, किंवा अर्धवट जळलेली झाडे असणेही अशुभ मानले गेले आहे. अशी झाडे घराच्या अवती भोवती असल्याने घरामध्ये नकारात्मक उर्जेचा संचार होत

असल्याचे वास्तुशास्त्रामध्ये सांगितले गेले आहे. त्याचप्रमाणे घराच्या आसपास ताड, कापूस अशी झाडे असल्यास घरामध्ये कलह उत्पन्न होण्याची शक्यता असते. चिंच किंवा मेहेंदी ची झाडे घराच्या प्रवेश द्वारापाशी असू नयेत. जर ही झाडे आपल्या घराच्या आसपास असतील, तर त्या झाडांच्या भोवताली तुळस, अशोक, हळद, कडुनिंब, नागकेशर अशी झाडे लावून ह्या झाडांची नकारात्मक ऊर्जा कमी करता येऊ शकते.

# वजन घटवण्यासाठी मदत करतो हा मांसाहारी आणि टेस्टी पदार्थ !

अंड्यामध्ये फॅट्स असल्यामुळे दररोज अंडी खाल्याने वजन वाढते, हा अनेक जणांचा गैरसमज आहे. परंतु तुम्ही वजन घटवण्याचा प्रयत्न करत असाल तर तुमच्या आहारात अंड्याचा समावेश असणे अतिशय आवश्यक आहे. अंडी ही शरीराला पोषक असूनही वजन घटवण्यासाठी कशी मदत करतात ते पाहू या -

प्रोटिन्सने परिपूर्ण -वजन घटवण्यासाठी स्नायूंना ताण देणारे व्यायाम केल्याने शरीरातील प्रोटिन्सचे प्रमाण बरेच कमी होते. यामुळे वजन घटवताना शारीरिक क्रियांसाठी व स्नायू मजबूत होण्यासाठी प्रोटिन्सची कमतरता निर्माण होऊ शकते. एका उकडलेल्या (१०० ग्रॅम) अंड्यामध्ये १३ ग्रॅम प्रोटिन असते. यामुळे पुरुषांची २३% तर स्त्रियांची २८% प्रोटिन्सची गरज भागवली जाते. वजन घटवण्यासाठी हे १० प्रोटिनयुक्त पदार्थही तुम्ही आहारात घेऊ शकता.मधुमेहींना अंड्याचे सेवन फायदेशीर, कमी होतो हृदयविकाराचा धोका

फॅट्स कमी असतात -अंड्यामध्ये शरीराला अपायकारक फॅट्स असतात असा बऱ्याच जणांचा समज असतो. परंतु प्रत्यक्षात त्यात फक्त १० ग्रॅम फॅट्स असतात. त्यामुळे तुम्ही डाएटवर असतानाही अंडी खाऊ शकता.



पोषक घटक असतात -अंड्यामध्ये पोषक घटक असल्याने ती शरीरासाठी फायदेशीर असतात. परंतु अंड्यातील पिवळ्या भागामध्ये पोषक घटकांबरोबरच कोलेस्टेरॉलही असते. म्हणून अंड्याचा पांढरा भाग दररोज खाल्ला तरी चालेल, परंतु वजन घटवणाऱ्यांनी अंड्याचा पिवळा भाग मात्र आठवड्यातून एकदाच खावा.

बराच वेळ भूक लागत नाही -मेटॅबॉलिझममध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, नाश्त्याला अंडे व अंड्याइतक्याच कॅलरी असणारा दुसरा पदार्थ खाल्यास अंड्यामुळे बराच वेळ भुकेवर नियंत्रण राहते. यामुळे बीएमआय आणि कंबरेचा घेर कमी होण्यास मदत होते.

सहज उपलब्ध होते -अंडी बाजारात सहज व माफक दरात उपलब्ध असतात. वजन घटवण्यासाठी आहारात अंड्यांचा नक्की समावेश करावा. तुम्ही अंडे कधीही खाऊ शकता. परंतु अंडे उकडूनच खावे, ऑमलेट किंवा बुर्जी करून खाऊ नये.

टिप्स -आहारात अंड्यांचा समावेश करण्याचे अनेक मार्ग असले तरी, तुम्ही त्यातील शरीराला लाभदायक असणारा पर्याय निवडणे आवश्यक आहे. असे काही पर्याय पुढे दिले आहेत :

अंडे उकडून खाणं हा अधिक पौष्टीक पर्याय आहे. यामध्ये फॅट्स कमी असतात. अंडे लवकर शिजते व पचनास हलके असते. फक्त त्यातील पिवळा भाग मात्र खाऊ नये. जेवणासाठी तुम्ही अंडे खाण्याचा विचार करत असाल तर ब्राउन ब्रेडबरोबर उकडलेले अंडे खाऊ शकता. यातून तुम्हांला फायबर आणि प्रोटिन मधून तुम्हांला दिवसभरासाठी ऊर्जा मिळेल.

## निवडणूक कर्तव्यावर..

औरंगाबाद (मध्य), औरंगाबाद (पूर्व) यांच्या साहित्य वितरण केंद्रास त्यांनी सकाळच्या सत्रात तर अन्य ठिकाणी दुपारच्या सत्रात भेट देऊन कर्मचाऱ्यांची विचारपूस केली व संबंधित मतदान केंद्रावर रवाना होणाऱ्या पथकांना शुभेच्छा दिल्या. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व्यंकट राठोड ,श्रीमती अर्चना खेतमाळीस, चेतन गिरासे यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यात केवळ महिला कर्मचाऱ्यांनी संचलित केलेले १६ मतदान केंद्र तयार केले जाणार आहेत. त्यातील चार जालना लोकसभा अंतर्गत येतात तरऔरंगाबाद लोकसभा अंतर्गत १२ मतदान केंद्र असतील. या महिला मतदान केंद्राच्या मतदान पोलिसांसह सर्व कर्मचारी महिला नियुक्त असतील. अशा या महिला मतदान केंद्र पथकांचा विशेष उत्साह दिसून आला. या पथकासही साहित्य वितरण करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

जिल्ह्यात ३०८५ मतदान केंद्र असून त्यात जालना लोकसभा मतदार संघाचा भाग असलेले १०४५ मतदान केंद्र हे ६१८ ठिकाणी आहेत. १९- औरंगाबाद मतदार संघात २०४० मतदान केंद्र ९७६ ठिकाणी आहेत. विधान सभा क्षेत्र निहाय मतदान केंद्र संख्या याप्रमाणे- जालना लोकसभा क्षेत्रातील १०४- सिल्लोड- ३५६, १०६ फुलंब्री-३५५, ११० पैठण- ३३४. १९- औरंगाबाद लोकसभा क्षेत्रातील १०५ कन्नड- ३५९, १०७ औरंगाबाद( मध्य)-३७४, १०८ औरंगाबाद(पश्चिम)-३७४, १०९ औरंगाबाद (पूर्व)-३०५, १११ गंगापूर- ३४८, ११२ वैजापूर-३३८.

जिल्ह्यात ३० लाख ६७ हजार ७०७ मतदार (सर्व्हिस मतदारांसह) आहेत. त्यात जालना मतदार संघात १० लाख ६,४८७ तर औरंगाबाद मतदार संघात २० लाख ६१ हजार २२० मतदार (सर्व्हिस मतदारांसह) आहेत. जिल्ह्याला ६१२० मतदान यंत्रे, २०४० कंट्रोल युनिट, २०४० व्हिव्हिपॅटची आवश्यकता आ हे. ते सर्व उपलब्ध असून सद्यस्थितीत ७३४१ मतदान यंत्रे, २४४५ कंट्रोल युनिट व २६४९ व्हिव्हिपॅट उपलब्ध आहेत. त्यातील उर्वरित यंत्रे ही राखीव ठेवण्यात आली आहेत. मतदान प्रक्रियेसाठी १७ हजार ७४० मनुष्यबळाची गरज असून २० हजार ५२४ कर्मचारी प्रशिक्षण घेऊन सज्ज आहेत.

या पथकांच्या ने आण करण्यासाठी १२०४ वाहने व ३८८ बसेस वापरात आणण्यात येत आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर मेडिकल किट सह मतदान यंत्रे, कंट्रोल युनिट, व्हिव्हिपॅट मशिन सह अन्य आवश्यक साहित्य, मतदान केंद्रावर लावण्यात येणारी सुचना फलके, दिशादर्शक स्टिकर्स, शाई, अन्य स्टेशनरी इ. सर्व साहित्य मतदान चमूला देण्यात आले. हे साहित्य घेऊन सायंकाळपर्यंत पथके रवाना करण्याचे कामकाज सुरु होते.

# प्रश्नांचे चिंतन करा

नोकरीसाठीचा इंटरव्ह्यू हे तसे कठीण कर्म असते. कारण इंटरव्ह्यू हा स्वतःच्या मार्केटिंगचा प्रकार असतो. आपले व्यक्तिमत्व आणि आपली क्षमता यांचे मार्केटिंग आपल्याला करायचे असते आणि तेही पूर्णपणे अनोळखी लोकांसमोर करायचे असते. त्यामुळे ते कठीण असते. परंतु आपण थोडे चिंतन केले तर हे मार्केटिंग सोपे जाऊ शकते. त्यासाठी काही सूचना आहेत. नोकरीच्या इंटरव्ह्यूसाठी काही ठराविकच प्रश्न विचारले जात असतात. त्यामुळे त्या प्रश्नांमध्ये अनपेक्षित काही नसते. म्हणून आपल्याला काय विचारले जाऊ शकेल याचा मनाशी आधी अंदाज बांधावा आणि तसा प्रश्न आल्यास आपण काय बोलले पाहिजे याचा विचार करून ठेवावा. अशा प्रकारच्या चिंतनातून नेमका शंभर टक्के अंदाज येईलच असे सांगता येत नाही. परंतु आपण योग्य उत्तराच्या जवळ जाऊ शकतो. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्याला विचारले जाणारे प्रश्न हे त्या कंपनीच्या स्वरूपावरही अवलंबून असते. तेव्हा प्रश्नांचा अंदाज बांधताना कंपनी, तिचे उत्पादन आणि तिचा विस्तार या गोष्टीवर थोडे चिंतन करावे. काही वेळा इंटरव्ह्यूमध्येच उमेदवाराला कंपनीविषयी काय माहित आहे, असे विचारले जाते. तेव्हा या चिंतनाचा विचार होतो. तुम्ही रिझ्यूम पाठवताना प्रत्यक्ष इंटरव्ह्यूच्यावेळी काही कागदपत्र सादर करण्याचे आश्वासन दिलेले असते. ते रिझ्यूममध्ये नमूद केलेले असते. म्हणून ती कागदपत्रे घेऊन जाणे आपल्यावर बंधनकारक असते. इंटरव्ह्यूचा वेळ नीट लक्षात ठेवा. मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये इंटरव्ह्यूची ठिकाणे सापडणे कठीण जाते, अशावेळी आधी जागा शोधलेली असावी. ऐनवेळी जागेची शोधाशोध करत बसलो आणि जागा न सापडल्यामुळे उशीर झाला तर ते चांगले दिसत नाही. इंटरव्ह्यू देताना गडबडून जाऊ नका, अती उत्तेजितही होऊ नका आणि चेहरा पाडूही नका. स्वतःविषयी माहिती सांगताना सगळीच माहिती सांगितली पाहिजे असे नाही. आपण त्या कंपनीत ज्या नोकरीसाठी आलो आहोत त्या नोकरीला कोणत्या पात्रतेची गरज आहे हे लक्षात घेऊन त्या पात्रतेविषयीची आपली माहिती जरूर सांगा.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# गृह मतदानाच्या पहिल्या दिवशी २१ ज्येष्ठ, दिव्यांग मतदारांनी केले मतदान

**मालेगाव/दैनिक यशसिध्दि न्यूज**

धुळे लोकसभा मतदारसंघासाठी येत्या २० मे, २०२४ रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या निवडणूकीत ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग मतदार व कोव्हीड-१९ रुग्ण मतदार यांना टपाली मतदान पथकामार्फत टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार ०२-धुळे लोकसभा मतदार संघातंर्गत ११५-मालेगाव बाह्य मतदारसंघात आज गृह मतदानाच्या पहिल्या दिवशी एकूण २१ मतदारांनी घरुन आपला मतदानाचा हक्क बजावला. अशी माहिती ११५-मालेगाव बाहय विधानसभा मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी निर्मळ यांनी दिली आहे.



भारत निवडणूक आयोगाने लोकसभा मतदार संघ निवडणूकीत प्रथमच ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग मतदार व कोव्हीड-१९ रुग्ण मतदार यांना टपाली मतदान पथकामार्फत टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार ११५-मालेगाव बाहय विधानसभा मतदार संघात पंधरा (१५) ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरीक तर सहा (६) दिव्यांग असे एकूण २१ मतदारांनी घरुन मतदानासाठी नोंदणी केली आहे. त्यानुसार धुळे लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली ११५-मालेगाव बाह्य विधानसभा मतदार संघात आज (१२ मे) रोजी गृहभेटीद्वारे टपाली मतदान करण्याचा दिवस निश्रि्चत करण्यात आला होता. त्याअनुषंगाने सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी निर्मळ यांनी संपूर्ण मतदार संघासाठी २ टीमची नियुक्ती केली होती. प्रत्येक टीममध्ये चार अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश असून या टीमने मतदारांच्या घरी जाऊन त्यांचे मतदान नोंदवून घेतले आहेत.धुळे लोकसभा मतदार संघात गृह मतदानासाठी ४३२ ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग मतदारांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी विधानसभा मतदार संघनिहाय पहिल्या फेरीत आजपर्यंत झालेले गृह मतदान धुळे शहर (४९), धुळे ग्रामीण (८६), शिंदखेडा (१०५), बागलाण (९८) मालेगाव मध्य (२४), मालेगाव बाह्य (२१) असे एकूण ३८३ मतदान नोंदविण्यात आले आहे. उर्वरित मतदारांचे गृह मतदार दुसऱ्या फेरीत घेण्यात येणार आहे.

# साक्री व शिरपूर विधानसभा मतदारसंघात निवडणूक साहित्यासह अधिकारी, कर्मचारी मतदान केंद्राकडे रवाना

**धुळे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

धुळे जिल्ह्यातील साक्री व शिरपूर हे विधानसभा मतदार संघ लोकसभा निवडणूकीकरीता ०१-नंदुरबार लोकसभा मतदार संघात येतात. या मतदार संघासाठी आज दि.१३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्या पार्श्र्वभूमीवर या दोन्ही विधानसभा मतदार संघात मतदान साहित्य, ईव्हीएम मशीन चे वाटप रविवार दि. १२ रोजी करण्यात आले. दुपार नंतर मतदान कर्मचारी ईव्हीएम मशीन व साहित्यासह मतदान केंद्राकडे रवाना झाले. आज सोमवार दि. १३ रोजी सकाळी ७ वाजेपासून



जिल्ह्यातील दोन्ही विधानसभा मतदार संघात मतदान प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांनी दिली आहे.

साक्री व शिरपूर विधानसभा मतदारसंघात ७०३ मतदान केंद्र

धुळे जिल्ह्यातील साक्री विधानसभा मतदारसंघात ३७० तर शिरपूर विधानसभा मतदारसंघात ३३३ असे दोन्ही मिळून ७०३ मतदार केंद्र आहेत. दोन्ही मतदार संघात प्रत्येकी एक मतदान केंद्र क्रिटीकल आहे. त्याठिकाणी आवश्यक बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच साक्री विधानसभा मतदार संघात ६ तर शिरपूर विधानसभा मतदार संघात १० मतदान केंद्र शॅडो मतदान केंद्र आहेत. याठिकाणी वॉकीटॉकीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दोन्ही मतदारसंघात ६ लक्ष ९० हजार ७७३ मतदार

धुळे जिल्ह्यातील साक्री व शिरपूर या दोन्ही विधानसभा मतदार संघात एकूण ६ लक्ष ९० हजार ७७३ मतदार आहेत. त्यात साक्री विधानसभा मतदार संघात १ लाख ८३ हजार ८३३ पुरुष मतदार तर १ लाख ७३ हजार १४६ महिला मतदार व ६ तृतीयपंथी तसेच ३४१ सर्व्हिस व्होटर आहेत. तर शिरपूर विधानसभा मतदार संघात १ लाख ७० हजार २६७ पुरुष मतदार तर १ लाख ६३ हजार ५१२ महिला मतदार व ९ तृतीयपंथी तसेच २३३ सर्व्हिस व्होटर मतदार आहेत. साक्री तालुक्यात १ हजार ९५२ दिव्यांग मतदार असून शिरपूर तालुक्यात २ हजार १६६ दिव्यांग मतदार आहेत. या मतदार संघातील सर्व मतदान केंद्रांवर दिव्यांगांसाठी रॅम्पची व्यवस्था उपलब्ध आहे.

मतदान केंद्रांवर मोबाईलला बंदी

साक्री आणि शिरपूर या दोन्ही मतदार संघात मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मोबाईल फोन, स्मार्ट वॉच, कार्डलेस फोन, वायरलेस सेटसह इलेक्ट्रॉनिक्स वस्तू वापरास, बाळगण्यास निर्बंध आहेत. मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांना मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल वापरता येणार नाही. त्यामुळे समूहाने मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांना मोबाईल मतदान केंद्राच्या बाहेरच ठेऊन जावे लागणार आहे. किंवा एकमेकांजवळ सांभाळायला द्यावे लागणार आहे.

सर्व सोयींनी परिपूर्ण असणार मतदान केंद्र

जिल्ह्यातील या दोन्ही विधानसभा मतदार संघात उभारण्यात आलेल्या ७०३ मतदान केंद्रांवर मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी मतदान केंद्रावर परिपूर्ण सोयी करण्यात आल्या आहेत. त्यात पिण्याचे पाणी, उन्हापासून बचाव करण्यासाठी मंडप किंवा शेड, मतदार सहाय्यता केंद्र, उन्हाळयातील वाढते तापमान लक्षात घेऊन प्रथमोपचार पेट्या, आणि प्रत्येक मतदान केंद्रासाठी ओआरएसचे पाकिटे तसेच आरोग्याशी संबंधित अडचणीसाठी आरोग्य केंद्र, अंगणवाडी व बालसंगोपन केंद्र, व्हीलचेअर या सह सर्व प्रकारच्या पूरक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी निर्भयपणे मतदानाला यावे

०१-नंदूरबार लोकसभा मतदार संघातील साक्री व शिरपूर विधानसभा मतदार संघात आज दि. १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदानासाठी घराबाहेर पडावे. प्रशासनातर्फे मतदान केंद्रावर सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्या सोबतच जिल्ह्यात निर्भयपणे मतदान प्रक्रिया पार पडावी यासाठी प्रशासनाने सर्व प्रकारची दक्षता घेतली आहे. मतदारांनी लोकशाहीच्या या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होऊन आपला हक्क बजवावा व मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

# धुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग मतदारांसाठी १०० व्हिलचेअर उपलब्ध

**धुळे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान प्रक्रियेमध्ये ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर सहज सुलभतेने ये-जा करता येण्यासाठी व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार धुळे जिल्ह्यासाठी १०० व्हिलचेअर उपलब्ध झाल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी दिली आहे. भारत निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणूकीच्या मतदानासाठी मतदान केंद्रावर आवश्यक मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर व्हीलचेअर उपलब्ध करुन देण्याचे निर्देश आहेत. धुळे जिल्ह्यातील साक्री व शिरपूर हे विधानसभा मतदार संघ लोकसभा निवडणूकीकरीता ०१-नंदुरबार लोकसभा मतदार संघात येतात. या मतदार संघासाठी सोमवार, १३ मे, २०२४ रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग मतदाता यांची ज्या मतदान केंद्रावर संख्या जास्त आहे. त्या मतदान केंद्रावर या व्हीलचेअर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामुळे ज्येष्ठ व दिव्यांग मतदार मतदान केंद्रावर सहज सुलभतेने ये-जा करु शकणार आहे. याकरीता शिरपूर विधानसभा मतदार संघासाठी ५० तर साक्री विधानसभा मतदार संघासाठी ५० व्हिलचेअर वितरीत करण्यात आल्या आहे.

# मोफत शिक्षण, शेतकऱ्यांना हमीभाव, सैन्याला विशेष अधिकार; अरविंद केजरीवालांनी जाहीर केल्या १० गॅरंटी

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केल्यानंतर ते तुरुंगातून बाहेर आले. यानंतर आज अरविंद केजरीवाल यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर आम आदमी पक्षाच्या १० गॅरंटी जाहीर केल्या आहेत. यामध्ये अग्निवीर योजना बंद कली जाईल, देशभरात दिल्ली-पंजाबसारखी २०० युनिटपर्यंत २४ तास मोफत वीज, कत्रांटी नोकऱ्या बंद करून कायमस्वरूपी नोकऱ्या देण्यात येतील, यासह आधी मोठ्या घोषणा अरविंद केजरीवाल यांनी केल्या आहेत.



मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषद घेत मोठ्या घोषणा केल्या आहेत. देशातील सर्व गरिबांना २०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याची घोषणा त्यांनी केली. आपल्या देशात ३ लाख मेगावॅट विजनिर्मिती करण्याची क्षमता आहे. मात्र, आपण त्याचा वापर फक्त २ लाख मेगावॅट एवढाच करतो, असं केजरीवाल यांनी सांगितलं.

उत्कृष्ट आणि मोफत शिक्षण

'आमची दुसरी गॅरंटी ही शिक्षणसाठी आहे. सर्वांसाठी चांगले आणि उत्कृष्ट तसेच मोफत शिक्षण देऊ. सरकारी शाळा या खासगी शाळांपेक्षा जास्त चांगले शिक्षण देऊ शकतात. आम्ही शिक्षणाचे मॉडेल दिल्लीत राबवले आहे, असंही केजरीवाल यांनी सांगितलं.

चांगली आरोग्य सेवा

आम्ही तिसरी गॅरंटी ही आरोग्याची देत आहोत. प्रत्येकासाठी चांगल्या प्रकारचा उपचार मिळायला हवा. प्रत्येक गावात मोहल्ला दवाखाने उघडले जातील. जिल्हा रुग्णालयांचे मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात रूपांतर केले जाईल, असंही केजरीवाल यांनी सांगितलं.

अग्निवीर योजना बंद केली जाईल

अग्निवीर योजना लष्करासाठी घातक असून ती कायम स्वरुपी बंद केली जाईल. याबरोबरच कत्रांटी नोकऱ्या बंद करून कायमस्वरूपी नोकऱ्या दिल्या जातील. तसेच भारतीय सैन्यास विशेष अधिकार दिले जातील,असं आश्र्वासनही केजरीवाल यांनी दिलं.

पुढं अरविंद केजरीवाल यांनी सांगितलं, शेतकऱ्यांच्या पिकाला जर योग्य दर मिळाला तर शेतकरी सन्मानाचे जीवन जगू शकतो. त्यामुळे स्वामीनाथन अहवालाच्या आधारावर शेतकऱ्यांना भाव दिला जाईल. तसेच आमची पुढची गॅरंटी ही दिल्लीला संपूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा असेल. याबरोबरच देशातील व्यापाऱ्यांसाठी धोरणं आखण्यात येईल. व्यापाऱ्यांना जास्त परवानग्यांची गरज असणार नाही. भाजपाच्या वॉशिंग मशिनला तोडण्याचं काम आमचे सरकार आल्यानंतर करणार आहे. सध्या भाजपा प्रामाणिक लोकांना तुरुंगात टाकण्याचं काम करत आहे आणि भ्रष्टाचारी लोकांना संरक्षण देत आहे, असेही केजरीवाल यांनी सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ते म्हणाले, मोदींनी सांगितले होते की,प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये जातील. पण तसे काही झाले नाही. दोन कोटी नोकऱ्या ते देणार होते. पण त्याही मिळाल्या नाहीत. मात्र, दुसरीकडे उत्तम शाळा, मोहल्ला दवाखाने, यासह शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेबाबत आम्ही हमी दिली होती आणि ती पूर्णही केली, असे केजरीवाल म्हणाले.

# पै.सचिन पाटील घिसा डावावरती ठरला श्री धुळदेव केसरीचा मानकरी

मोहोळ/प्रतिनिधी : मोहोळ तालुक्यातील नजीक पिंपरी येथील श्री धुळदेव यात्रेनिमित्त निकाली कुस्त्यांचे मैदान प्रथमच आयोजित करण्यात आले होते 'श्री धुळदेव केसरी २०२४' जंगी मैदान आयोजित करण्यात आले होते. उद्योजक राजू खरे यांनी १ लाख ५१हजार रुपयांचे बक्षीस तर या स्पर्धेमध्ये क्षीरसागर परिवाराच्या वतीने स्व. अभिजीत दादा क्षीरसागर यांच्या स्मरणार्थ ७५ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. गावकरी व कुस्ती प्रेमीनी मैदानातील कुस्त्यांचा आनंद घेतला. नावाजलेल्या मल्लांची कुस्ती पाहण्यासाठी मोहोळ तालुक्यातील मोठ्या प्रमाणात कुस्ती शौकिन उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमास उद्योजक मा. राजू खरे, सुशील ( भैय्या )क्षीरसागर संयोजक मा. पै. सुनील तात्या पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस मा. विकास वाघमारे, आबासाहेब गुरव,पै.रमेश आप्पा जाधव,विलास तेरवे ,मा. दीपक गवळी, मा. दीपक पुजारी, मा. मुजीब मुजावर, मा. महावीर पुजारी, मा. नवनाथ गाढवे, मा. दिनेश गडदे, पै.भीमराव मुळे आदीसह पैलवान व वस्ताद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एनटीपीसी सोलापूर येथे बालिका सशक्तीकरण मिशन उन्हाळी कार्यशाळा सुरू



सोलापूर/प्रतिनिधीः तरुण मुलींना सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या क्षमता वाढवण्याच्या प्रयत्नात, एनटीपीसी चा प्रमुख CSR उपक्रम, बालिका सशक्तीकरण मिशन (GEM) उन्हाळी कार्यशाळा चे १० मे २०२४ रोजी एनटीपीसी सोलापूर येथे सुरूवात झाली. उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे कादर शेख, जिल्हा शिक्षणाधिकारी-सोलापूर, विशेष अतिथी श्री मल्हारी तुकाराम बनसोडे, गटशिक्षणाधिकारी-दक्षिण सोलापूर, आणि डॉ. विजया महाजन, प्राध्यापिका-सामाजिक कार्य, वालचंद कॉलेज, सोलापूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाला श्री तपन कुमार बंदोपाध्याय, HOP (सोलापूर), जे ऑनलाइन थिम्स विडिओ द्वारे सामील झाले होते आणि बिपुल कुमार मुखोपाध्याय, GM (OM), श्रीमती. जयमाला मुखर्जी, उपाध्यक्षा सृजन महिला मंडळ, एचओडी, युनियन आणि असोसिएशनचे प्रतिनिधी आणि इतर कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते . तपन कुमार बंदोपाध्याय, एचओपी (सोलापूर), यांनी तरुण मुलींना त्यांची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सक्षम करण्यासाठी एनटीपीसी ची वचनबद्धता व्यक्त केली. बिपुल कुमार मुखोपाध्याय, GM (OM) यांनी सहभागींना प्रदान केलेल्या संधींचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी आणि शिक्षण स्वीकारण्यास प्रोत्साहित केले.

कादर शेख यांनी उपस्थितांना संबोधन करताना स्थानिक मराठी भाषेत संदेश देत, समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी मुलींना शिक्षण देण्याचे महत्त्व पटवून दिले. डॉ. विजया महाजन यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि एनटीपीसी च्या विचारशील उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

GEM-2024 साठी जवळपासच्या शाळांमधील एकूण ४५ मुलींची नोंदणी झाली आहे, नोट्रे डेम स्कूल, NTPC सोलापूर, त्यांच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहे.

GEM उपक्रमाचा उद्देश सर्जनशीलता वाढवणे, मानसिक आणि सामाजिक विकास वाढवणे, आणि शिकण्याला चैतन्यशील बनविणे आणि सहभागींसाठी परिणामकारक अनुभव अनुभव निर्माण करणे हा आहे.संवाद कौशल्ये, प्राथमिक शिक्षण, स्वच्छता, पोषण, योग, खेळ आणि लैंगिक वैविध्य समस्यांवरील चर्चा यांचा समावेश असलेल्या अनुरूप कार्यक्रमांद्वारे, एनटीपीसी मुलींमध्ये अत्यावश्यक शिक्षण, आरोग्य

आणि स्वसंरक्षणाविषयी जागरुकता निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवते.शिवाय, कार्यक्रमात सामाजिक विषयांवर चित्रपट प्रदर्शित करणे, सायबर सुरक्षा सत्रे, आणि सहभागींची प्रतिभा आणि क्षमता प्रदर्शित करण्यासाठी संगीत, नृत्य आणि थिएटरसाठी संधी.

# आ.प्रणिती शिंदे यांनी फडणवीस यांचा अंदाज चुकला, व भाजपवाल्यांची धाकधूक वाढली

**पंढरपूर/प्रतिनिधी**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर सोलापूर लोकसभा मतदारसंघात मोठी चुरस निर्माण झाली आहे या ठिकाणी माजी मुख्यमंत्री व देशाचे माजी गृहमंत्री यांची लेक व सोलापूरची लेक यांच्याविरुद्ध उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खास मर्जीतील व अतिशय जवळचे असणारे राम सातपुते असा सामना होत आहे यामुळे रंगत वाढले आहे



त्यावेळी सोलापूर लोकसभा मतदारसंघात ५७.४६% इतका मतदान झाले आहे या ठिकाणी अक्कलकोट उत्तर सोलापूर या भागातून पणती शिंदेंना मतदान कमी होण्याची शक्यता आहे पण रान सातपुते यांना सोलापूर शहर मध्य दक्षिण सोलापूर मंगळवेढा पंढरपूर विधानसभा मतदारसंघांमध्ये फटका बसेल असे सांगितले जात आहे

दरम्यान हे दोघेही तगडे उमेदवार असल्याने नेमके कोण निवडून येईल याचा अंदाज लावणं कठीण झाला आहे त्यामुळे आता चार जून ची वाट बघावी लागणार आहे असे असले तरी प्रणिती शिंदे या स्थानिक उमेदवार म्हणून त्यांची परडी जड मानले जात असल्याचे नागरिकांतून मत व्यक्त होत आहे.नागरिकांमध्ये प्रणिती शिंदे बद्दल सोलापूरची लेक अशी प्रतिमा निर्माण करण्यात काँग्रेसला यश आले आहे त्यामुळे आता दोन वेळा झालेल्या पराभव यावेळी खंडित राहणार का असाही प्रश्र्न उपस्थित केला जात आहे प्रणिती शिंदे काँग्रेसचे उमेदवार असणार हे जवळपास निश्र्चित होते

मी तशी माहिती त्यांना देण्यात आली होती त्यामुळे प्रणिती तीन महिने आधीपासूनच मतदार संघात कामाला लागल्या होत्या त्यांनी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला तसेच अनेक मुद्दे पुढे केले व गेल्या पाच वर्षे खासदार फिरकले नाहीत हा सुद्धा मुद्दा त्यांनी

सातपुते यांची उमेदवारी बरीच उशिरा जाहीर झाली त्यामुळे त्यांना मतदारसंघात करण्यास फारसा वेळ मिळाला नाही दक्षिण सोलापूर तालुक्यातील साखर कारखान्याची चिमणी भाजपला त्रास झाल्यावर कारखान्याची चेअरमन धर्मराज गाडाधी यांनी भाजप विरोधात लिंगायत समाजाचा एकत्रित केले आणि प्रदीप शिंदे यांना पाठिंबा दिला त्यामुळे आमदार प्रणिती शिंदे यांच्या विजय निश्र्चित असल्याचे मतदारातून बोलले जात आहे

# महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक कर्मचारी संघटना ठाणे जिल्हा अध्यक्षपदी नामदेव फर्डे तर उपाध्यक्षपदी शशिकांत चव्हाण यांची निवड



**ठाणे/मिलिंद जाधव**

महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक/निरीक्षक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या ठाणे जिल्हा कार्यकारणीची नियुक्ती पंचायत समिती सभागृह कल्याण येथे करण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील जिल्हा व राज्यस्तरीय आरोग्य निरिक्षक यांच्या सयुक्तिक, उपस्थितून ही निवड करण्यात आली आहे.

या सभेला महाराष्ट्र राज्य संघटना कार्यकारणीचे सचिव अमर तायडे उपस्थित होते. यावेळी, संघटनेची ध्येयधोरण तसेच आतापर्यंत या संवर्गावर शासन दरबारी झालेल्या अन्यायकारक बाबींवर चर्चा करुन संघटना वाढीसाठी चे प्रयत्न तसेच आवश्यक तेथे सनदशीर मार्गाने

लढ्याची तयारी यासह सर्व विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद व राज्यस्तरीय आरोग्य निरिक्षक एकत्रित आल्याने सर्वांनी समाधान व आनंद व्यक्त केला. या नंतर उपस्थितांच्या सहमतीने व सर्वांनु मते चर्चा करून संघटनेच्या ठाणे जिल्ह्याच्या, पदाधिकाऱ्यांची नियुक्ती पुढील प्रमाणे करण्यात आली.

ठाणे जिल्हा अध्यक्ष नामदेव फर्डे,उपाध्यक्ष शशिकांत चव्हाण, दत्तात्रय भोंडवे , कार्याध्यक्ष राजेंद्र देवरे ,सचिव बळीराम फराड ,सहसचिव अशोक तिवरे,नामदेव पडवळ, खजिनदार रविराज गायकवाड ,मुख्य संघटक किरण यशवंतराव अंतर्गत हिशोब तपासणीस धीरू राठोड यांचे सह मुख्य सल्लागार मंगल पवार, संजय धनगर, शिवाजी पगार व प्रदीप चंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यावेळी ठाणे जिल्ह्यातील तालुका स्तरावरील प्रतिनिधी पदाधिकारी यांची सुद्धा निवड करण्यात आली. नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धर्मा वानखडे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे यावेळी उपस्थितांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

# चक्क पंढरपूर नगरपरिषदेच्या जुन्या इमारतीवर केले वृक्षारोपन

## पंढरपूरकर नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराकडं लक्ष द्या!

**पंढरपुर/प्रतिनिधी:**




चंद्रभागेच्या तीरावर अत्यंत सुबक व रेखीव बांधकाम असणारी पंढरपूर नगरपरिषदेची पुरातन ऐतिहासिक इमारत आज वापराविना धुळखात पडून आहे. या इमारतीवर व आवारात मोठमोठी झाडे,झुडपे वाढल्याने इमारतीला झाडा-झुडपांचा विळखा पडलाय. शासनाच्या वृक्ष लागवढीचा संदेश जपत पंढरपूर नगरपरिषदेच्या अधिकार्यांनीच या इमारतीवर अशी मोठमोठी झाडी लावली आहेत की काय? अन् जर हे खरे असेल तर अशा कर्तव्यदक्ष व दुरदृष्टीच्या अधिकार्यांचा सत्कारंच करायला हवा! असा उपरोधात्मक प्रश्न विचारत महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी या इमारतीवरील सर्व झाडे, झुडपं, वैली काढुन ही इमारत सुशोभित करुन वापरात आणावी अशी मागणी केली आहे.

वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धासाठी मिळणारा दोन-दोन कोटींचा निधी कुठे खर्च होतो?

वास्तवीक पहाता पंढरपूर नगरपरिषदेकडून दर वर्षी वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनासाठी कोट्यावधी रुपयांचे टेंडर काढते, हे पैसे कुठे खर्च होतात? याचा हिशोब त्यांनी पंढरपुरकरांना दिलाय का? की कुणालाही त्रास होऊ नये म्हणून या सर्व निधीचा वापर जुन्या नगरपरिषदेच्या इमारतीवर वृक्ष लागवड करण्यासाठी केला जातोय? असे प्रश्नही यावेळी गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केले. आज पंढरपूर शहर व परिसरात नजर टाकली तर कुठेच मोठ मोठी झाडं राहिलेली नाहीत.

रस्त्यांच्या कामासाठी मोठमोठी पुरातन वृक्षांची कत्तल केली गेली. त्यानंतर वृक्ष लागवड व संगोपन करण्याचा संकल्प शासनाने केला, यासाठी कोट्यावधींचा निधीही मिळाला परंतु या निधीद्वारे कोणत्याही प्रकारची लक्षवेधी अशी वृक्षलागवड झालेली आढळुन येत नाही.

दरवर्षी नगरपरिषदेकडून अंदाजे दोन कोटी रुपयांचे टेंडर हे वृक्ष लागवडीसाठी निघते, पण या निधीचा योग्य ठिकाणी योग्य वापर होत नाही, ठेकेदार अनं त्यांचे बगलबच्चे यांचे उखळ पांढरे होते. अशा प्रकारचे खुप मोठे पातक पंढरीच्या पांडुरंगाचीही भीती नसलेल्या कांही बांडगुळांकडून वर्षानुवर्षे होत आले आहे, त्यांना वेळीच आवर नाही घातला तर शासनाच्या किती तरी चांगल्या कामासाठीचा निधी असाच लाटला जाईल अन् जनतेच्या हितासाठीची कामं रखडलेलीच दिसतील. आता तरी पंढपुरकरांनी याविरुध्द आवाज उठवायला हवा,

एकदिलानं नगरपरिषदेच्या कारभारात काय चालतंय, याकडं लक्ष घालावं अन्यथा एकही रुपयाचा निधी नगरपालिकेच्या कराचा भरु नये. असे आवाहन महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी सर्वसामान्य पंढरपुरकरांना केलंय. लवकरात लवकर चंद्रभागेच्या तीरावरील नगरपरिषेची पुरातन इमारत स्वच्छ करुन तीची डागडुजी करावी अन्यथा तेथील; झाडे तोडून नगरपरिषदेच्या नव्या इमारतीत रचण्यात येतील व तीव्र आंदोलन करण्यात येईल असा गंभीर इशारा गणेश अंकुशराव यांनी दिला आहे. यावेळी गणेश अंकुशराव, वैभव कांबळे, अप्पा करकमकर, गणेश कांबळे, नितीन शिरगुर, उल्केश कोळी, महेश कोळी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# बिबवेवाडी अप्पर डेपो येथे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती मोठ्या उत्सवात साजरी

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**



महामानव,विश्र्वगुरू,परिवर्तनवादी,सत्वपुरूष,लिंगायत धर्म संस्थापक,सामाजिक समतेचे आद्य प्रवर्तक,थोर समाजसुधारक,वर्गविरहित समाज निर्माता जगद्ज्योती महात्मा बसवेश्र्वर यांची ८९३ वी जयंती अक्षय-तृतीया दि. १० मे रोजी बिबवेवाडी अप्पर डेपो येथे श्री संगनबसवेश्र्वर तरुण मंडळाच्या वतीने विविध उपक्रमाने मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला.

बाजीराव रोड येथील महात्मा बसवेश्र्वर यांच्या पुतळ्याला संगनबसवेश्र्वर तरुण मंडळाच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी ज्योत प्रज्वलित करून ती ज्योत पायवाट मार्गे अप्पर डेपो येथे इच्छित कार्यक्रम स्थळी आणून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून अक्कलकोट तालुक्याचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, मा नगरसेवक पिंटू भाऊ धाडवे,नगरसेवक बाळासाहेब ओसवाल,नगरसेविका रुपालीताई दिनेश धाडवे,नगरसेविका वर्षाताई साठे, भाजपा अनु :जाती मोर्चा शहर अध्यक्ष भीमराव साठे, शिव संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष शैलेश जकापुरे, युवा उद्योजक संजय पाटील,सामाजिक कार्यकर्ते मनोज देशपांडे,अखिल भारतीय मराठा पुणे शहर उपाध्यक्ष -भाजपा पर्वती सरचिटणीस ज्ञानेश्र्वर माऊली मानकर,श्री गणेश मित्र मंडळ अध्यक्ष प्रीतम शेठ नागपुरे,शिवशंभो टायर्स मा यार्ड गणेश घाटे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर सरचिटणीस गणेश मोहिते,गनिमी कावा युवा सेवा संघ संजय वाघमारे,युवा उद्योजक मधुकर सुरवसे,या सर्व प्रमुख उपस्थितांच्या हस्ते महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली.यावेळी प्रमुख उपस्थितांनी महात्मा बसवेश्र्वर यांच्या जीवनावर आधारित काही प्रसंग व त्यांची शिकवण याविषयी सर्व उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले.याचवेळी महात्मा बसवेश्र्वर यांचा जन्मोत्सव सोहळा देखील मोठ्या संख्येने महिलांच्या उपस्थित पारंपारिक पद्धतीने महिलांनी पाळण्याची पूजा करून जन्माचा पाळणा सोहळा,गीत गाऊन व महात्मा बसवेश्र्वरांचा गजर केला.या कार्यक्रमात मोठ्या संख्येने अप्पर डेपो येथील बसवेश्र्वर भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.तसेच सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये संगनबसवेश्र्वर तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अशोक धोनी वर्दाळे, अध्यक्ष खंडू माने,उपाध्यक्ष शिवशरण रामचंद्र चिकमळ, सचिव शांतमल काळे,संग्राम आळदे,सुनील चिकमळ,बसवराज माळी,अभय माळी,बसवराज आलदे,श्रीशैल चिकमळ,संतोष माळी,रामेश्र्वर बिराजदार, सायबण्णा म्हेत्रे, शरणप्पा आलदे,बसवराज चौघुले, श्रीशैल निंगदळी,पुंडलिक बिराजदार,खजिनदार रेवणप्पा चिकमळ,सिद्धाराम माळी,रवी आलदे,जगदीश येणंपुरे,प्रकाश थंब,संतोष माळी,स्वागतोत्सुक इराण्णा मंठाळे,कार्याध्यक्ष मल्लिनाथ फुलारी,व साप्ताहिक राष्ट्रहित सर्वोपरी मीडिया समूहाचे मुख्य संपादक अमोल धडके, सर्व संघटक,कार्याध्यक्ष,आधारस्तंभ कार्यकर्ते, छोटे कार्यकर्ते,महिला व मंडळ,स्वागतोत्सुक,संगनबसवेश्र्वर तरुण मंडळाचे सर्व सभासद,स्थानिक नागरिक,मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडू माने यांनी केले.

# घरोघरी मातीच्या चुली मालिकेतील ऐश्वर्या-सारंगच्या संगीत सोहळ्यासाठी बाईपण भारी देवा चित्रपटाच्या टीमची खास हजेरी



स्टार प्रवाहच्या घरोघरी मातीच्या चुली मालिकेत सध्या सुरु आहे ऐश्र्वर्या-सारंगच्या लग्नाची धामधूम. हळद आणि मेहंदीचा कार्यक्रम थाटात पार पडल्यानंतर आता लगबग सुरु आहे संगीत सोहळ्याची. या खास सोहळ्यासाठी ऋषिकेश, जानकी, सारंग, ऐश्र्वर्या आणि संपूर्ण कुटुंबासोबतच खास पाहुणेही परफॉर्म करणार आहेत. स्टार प्रवाहच्या परिवारातील सिंधू-राघव, सागर-मुक्तासोबतच महाराष्ट्राचा सुपरहिट चित्रपट बाईपण भारी देवाची टीमही सारंग आणि ऐश्र्वर्याला शुभेच्छा देण्यासाठी येणार आहेत. बाईपण भारी देवाची टीम घरोघरी मातीच्या चुली मालिकेच्या शीर्षकगीतावर परफॉर्म देखिल करणार आहे. १९ मे ला सायंकाळी ७.३० वाजता स्टार प्रवाहवर बाईपण भारी देवा चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन होणार आहे. त्यानिमित्ताने या टीमने घरोघरी मातीच्या चुली मालिकेत खास हजेरी लावली. तेव्हा पाहायला विसरु नका घरोघरी मातीच्या चुली मालिकेचा संगीत सोहळा विशेष भाग सायंकाळी ७.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# दक्षिण मुंबई लोकसभा मतदरसंघांच्या महायुतीच्या उमेदवार यामिनी जाधव यांच्या प्रचारासाठी केंद्रीय राज्यमंत्री आठवले मैदानात

## रिपब्लिकन पक्षाचे सोमवारी वरळीत कार्यकर्ता संमेलन

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघाच्या महायुती च्या उमेदवार सौ यामिनी ताई यशवंत जाधव यांच्या प्रचारासाठी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले मैदानात उतरले आहेत.

यामिनी यशवंत जाधव या भीमकन्येला विजयी करण्यासाठी दक्षिण मुंबई जिल्ह्यातील सर्व रिपब्लिकन कार्यकर्ते आंबेडकरी जनतेची एकजूट करून व्युहरचना करण्यासाठी उद्या सोमवार दि.१३ मे रोजी संध्याकाळी ६ वाजता वरळी येथील बिडीडी चाळ इमारत क्र.९५ समोर अंबेडकर भवन येथे रिपब्लिकन जिल्हा कार्यकर्ता संमेलन आयोजित करण्यात आल्याची माहिती रिपाइं चे दक्षिण मुंबई जिल्हा अध्यक्ष संजय पवार यांनी दिली आहे. वरळी येथे सोमवारी होणाऱ्या या रिपब्लिकन जिल्हा कार्यकर्ता संमेलनास रिपाइं चे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले उपस्थित राहून मार्गदर्शन करणार



आहेत.यावेळी रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे ; चंद्रकांत पाटील; आशाताई लांडगे; सचिनभाऊ मोहिते; शिरिषभाई चीखलकर ; अभयाताई सोनवणे; उषाताई रामलू आदी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.